वाचा :- १) गट शिक्षण अधिकारी,पं.स.ईगतपूरी यांचे कडील पत्र क्रमांक पसई/आ-३/४४५/२०१२ दिनांक २५/९/२०१२
२) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नाशिक यांचेकडील ज्ञापन शिक्षण/प्राथ-९/५०२/२०१६ दि.६/१०/२०१६
३) या कार्यालयाची अंतीम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/४४४/२०१७ दि.४/५/२०१७
४) श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे प्राथ.शिक्षक जि.प.प्राथ.शाळा तारांगणपाडा ता.ईगतपूरी यांचा खुलासा दि.५/५/२०१७
५) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.नाशिक यांचे दालनात सुनावणी दि.२१/८/२०१७
६) कार्यालयीन मंजुर टिपणी दिनांक २१/८/२०१७

नाशिक जिल्हा परिषद, नाशिक
जा.क्र.शिक्षण/प्राथ-९/६२३/२०१७
नाशिक दिनांकः २३/ ८/२०१७

**आदेश**

ज्याअर्थी श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे प्राथ शिक्षक जिल्हा परिषद शाळा तारांगणपाडा ता.ईगतपूरी येथे काम करीत असतांना शासकीय कामकाजात गैरवर्तणूक व नियमबाहय वर्तन केल्याने संदर्भ क्र.१ गट शिक्षण अधिकारी पंचायत समिति ईगतपूरी यांचे कडील पत्र क्रमांक पसई/आ-३/४४५/२०१२ दिनांक २५/९/२०१२ अन्वये श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे यांचे विरुध्द खाते निहाय चौकशी करणे कामी दोषारोप पत्र क्र.१ ते ४ सादर करण्यात आले होते.

ज्याअर्थी श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे प्राथ शिक्षक यांना संदर्भ क्र.२ मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे कडील ज्ञापन शिक्षण/प्राथा-९/५०२/२०१६ दि.६/१०/२०१६ अन्वये ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्र.१ ते ४ बजाविण्यात आले असुन सदर ज्ञापनास श्री.गांगुर्डे यांनी खुलासा दिनांक २५/१०/२०१६ रोजी सादर केलेला आहे.

ज्याअर्थी श्री.गांगुर्डे प्राथ.शिक्षक यांनी ज्ञापन व परिशिष्ट दोषारोप पत्र क्रमांक १ ते ४ ला खुलासा सादर केलेला असुन त्यांनी त्यांचेवर असलेले आरोप मान्य केलेले आहे. श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे प्राथ शिक्षक यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग -३ मधील कलम २ नुसार दोन वेतनवाढ भावी काळातील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने का बंद करण्यात येवू नये ? तसेच अनाधिकृत गैरहजर कालावधी १) दि.१९/११/२००३ ते ४/१२/२००३ एकूण १६ दिवस २) दि.९/१२/२००३ ते दि.१६/१२/२००३ एकूण दिवस ८ ३) दि.१८/१२/२००३ ते दि.३१/१२/२००३ एकूण दिवस १४ ४) दि.१/२/२००४ ते दि.५/२/२००४ एकूण दवस ५ ५) दि.११/२/२००४ ते दि.१३/२/२००४ एकूण दिवस ३ ६) दि.२४/२/२००४ ते दि.२६/२/२००४ एकूण ३ दिवस ७) दि.१/५/२००४ ते दि.१८/७/२००४ एकुण ७९ दिवस ८) दि.१९/७/२००४ ते दि.३०/१०/२००४ एकूण १०२ दिवस ९) दि.१/११/२००४ ते दि.१८/११/२००४ एकूण १८ दिवस १०) दि.१९/११/२००४ एकूण १ दिवस एकूण दिवस २४९ सेवानिवृत्ती वेतनासह सर्वप्रयोजनार्थ म.ना.से (रजा) नियम १९८१ चे नियम ६३ (३) अन्वये विनावेतन (अकार्यदिन) म्हणून मंजुर का करण्यात येवू नये ? या बाबत अंतीम कारणे दाखवा नोटीस क्रमांक शिक्षण/प्राथ-९/४४४/२०१७ दि.४/५/२०१७ अन्वये देण्यात येवून त्या बाबत खुलासा २१ दिवसाच्या आत सादर करणे बाबत कळविण्यात आलेले होते.

ज्याअर्थी मिलींद प्रल्हाद गांगुर्डे प्राथ शिक्षक यांनी अंतीम कारणे दाखवा नोटीसीस दिनांक ५/५/२०१७ रोजी खुलासा सादर केलेला आहे. सदर खुलासा मुदतीत व असमाधानकारक असल्याने श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे प्राथमिक शिक्षक यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा,जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केल्याचे सिध्द होते.

ज्याअर्थी मिलींद प्रल्हाद गांगुर्डे प्राथ शिक्षक यांना दिनांक २१/८/२०१७ रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे दालनात सुनावणी घेऊन सदर प्रकरणी बाजु माडणे बाबत संधी देण्यात आलेली आहे.

त्याअर्थी श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे प्राथ शिक्षक यांना त्यांचे विरुध्द खाते चौकशी प्रकरणी शासन होणे बाबत नियुक्ती प्राधीकारी या नात्याने माझे मत झाल्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारा अन्वये श्री.गांगुर्डे प्राथमिक शिक्षक यांचे विरुध्द महाराष्ट्र जिल्हा परिषदा, जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे भाग -३ मधील कलम २ नुसार दोन वेतनवाढ भावी काळीतील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा रितीने बंद करण्यात येत आहे .तसेच अनाधिकृत गैरहजर कालावधी १) दि.१९/११/०३ ते ४/१२/०३ एकूण १६ दिवस २) दि.९/१२/२००३ ते दि.१६/१२/२००३ एकूण दिवस ८ ३) दि.१८/१२/२००३ ते दि.३१/१२/२००३ एकूण दिवस १४ ४) दि.१/२/२००४ ते दि.५/२/२००४ एकूण दवस ५ ५) दि.११/२/२००४ ते दि.१३/२/२००४ एकूण दिवस ३ ६) दि.२४/२/२००४ ते दि.२६/२/२००४ एकूण ३ दिवस ७) दि.१/५/२००४ ते दि.१८/७/२००४ एकुण ७९ दिवस ८) दि.१९/७/२००४ ते दि.३०/१०/२००४ एकूण १०२ दिवस ९) दि.१/११/२००४ ते दि.१८/११/२००४ एकूण १८ दिवस १०) दि.१९/११/२००४ एकूण १ दिवस एकूण दिवस २४९ सेवानिवृत्ती वेतनासह सर्वप्रयोजनार्थ म.ना.से (रजा) नियम १९८१ चे नियम ६३ (३) अन्वये विनावेतन (अकार्यदिन) म्हणून मंजुर करण्यात येत आहे.

सदरच्या आदेशाची नोंद श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे प्राथ शिक्षक यांचे मुळसेवा पुस्तकात घेण्यात यावी.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

**प्रति,**

श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे ,प्राथमिक शिक्षक जिल्हा परिषद शाळा तारांगणपाडा ता.ईगतपूरी
व्दारा : गटशिक्षण अधिकारी पंचायत समिती ईगतपूरी

प्रतः- गटशिक्षणअधिकारी पंचायत समिती ईगतपूरी.
२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्री.मिलींद प्रल्हाद गांगुर्डे ,प्राथमिक शिक्षक यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

**प्रत :-** मा.मु.का.अ.जि.प.नाशिक यांचे वैयक्तीक कार्यालय/आय.टी.सेल (साप्रवि) जि.प.नाशिक

**प्रतः-** प्राथमिक -९ शिक्षण विभाग जि.प.नाशिक

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद नाशिक